## महत्वाचे

### खांडगाव सप्ताहाची धुरा महिलांच्या हाती

**करंजी (वार्ताहर)–** आई-वडिलांची सेवा करा आणि देशाची संस्कृती जपा असे आवाहन राष्ट्रीय कीर्तनकार अश्विनी महाराज म्हात्रे यांनी केले. खांडगाव येथे हरिनाम सप्ताह सुरू झाला आहे. यावर्षी याठिकाणी महिला कीर्तनकारांना आमंत्रित करण्यात आले आहे. यात गायनाचार्य सुवर्णा गिरी, योगिता हजारे तर मृदंगाचार्य ज्ञानेश्वरी क्षिरसागर तर टाळकरी म्हणून महिला मुलींनाच संधी देण्यात आली आहे. सप्ताहाच्यानिमित्ताने अतिशय उत्कृष्ट असे नियोजन महिलांनी केले आहे. या सप्ताहासाठी सोनाली महाराज बोरुडे, वैष्णवी महाराज मुखेकर, अश्विनी महाराज म्हात्रे, वैष्णवीताई महाराज कोठावळे, भारती महाराज गाडेकर, गीतांजली महाराज झेंडे, मुक्ताबाई महाराज सोनवणे यांच्यासह शारदा महाराज सूर्यवंशी यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. सप्ताहाच्या व्यासपीठाचा मान महिला भगिनींना देत खांडगाव ग्रामस्थांनी संत जनाबाई यांच्या विचारांना चालना दिली आहे. देशातील संत महंतांच्या कार्यामुळेच भारताची संस्कृती आणि धर्म टिकून असल्याचे आवर्जून सांगत ते बोलून दाखवण्याचे धाडस माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील या एका महिलेनेच केले आहे. महिले शिवाय कुटुंबाचीच नव्हे तर देशाची देखील प्रगती शक्य नाही, असा विश्वास अश्विनी म्हात्रे महाराज यांनी व्यक्त केला.

### निधी नाही अन् सत्कारही घेणार नाही

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)–** सोबलेवाडी येथील मतदारांनी मला खासदर करण्यासाठी मोलाची मदत केली. म्हणून जागृत हनुमान मंदिरसमोरील सभामंडप व खोल्यासाठी भरघोस निधी उपलब्ध करून देईल असा शब्द देतो, असे प्रतिपादन खासदार डॉ. निलेश लंके यांनी केले. सोबलेवाडी येथील पावन हनुमान मंदिर जीर्णोद्धार व कळस कामाचा भूमिपूजन सोहळा प्रसंगी ते बोलत होते. यावेळी लंके म्हणाले, पारनेर नगरपंचायतला मागील माजी आमदाराने चार पाच कोटी रूपये दिले म्हणून सगळीकडे दिंडोरा पिटवला. परंतु मी आमदार असताना याच नगरपंचायतला ३५ कोटी निधी उपलब्ध करून दिला. मात्र, आमचे नगरसेवक असताना मी पारनेर शहरात मतदानात मागे राहिलो. त्यांची खंत माझ्या मनात आहे. या पुढे पारनेर नगरपंचायतसाठी एक रुपयाही निधी मी देणार नाही. तसेच पारनेर नगरपंचायत परिसरात सत्कार स्वीकारणार नाही. मी सोबलेवाडी येथे सत्काराला आलो, कारण तुम्ही मताधिक्य दिले. यावळी भागा शेरकर, माजी सरपंच बाळासाहेब शेरकर, शिरीष शेटिया, किसन म्हस्के, गणपत सोबले, विलास सोबले, बाळासाहेब सोनवणे, शहाजी म्हस्के, विनोद शेरकर, राजेंद्र शेरकर, मच्छिंद्र शेळके ग्रामस्थ उपस्थित होते.

### युवा सेनेच्या तालुका समन्वयकपदी कराळे

**तिसगाव (वार्ताहर)–** पाथर्डी तालुका युवा सेना समन्वयकपदी कामत शिंगवे येथील घनश्याम कराळे यांची निवड करण्यात आली आहे. शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख व माजी जिल्हा परिषद सदस्य स्वर्गीय अनिल कराळे यांचे पुतणे घनश्याम कराळे यांना शिवसेनेकडून युवा सेनेत युवकांचे संघटन बांधण्याची जबाबदारी देऊन कराळे कुटुंबावर पुन्हा एकदा उद्धव ठाकरे शिवसेना पक्षश्रेष्ठींनी विश्वास व्यक्त केला आहे. अनिल कराळे यांनी खऱ्याअर्थाने पाथर्डी तालुक्यातील तरुणांमध्ये शिवसेनेचे विचार घेऊन जाण्याचे काम केले.अनेक प्रस्थापितांच्या विरोधात देखील त्यांनी शिवसेनेच्या माध्यमातून राजकीय लढा दिला. युवा सेनेचे महाराष्ट्र सहसचिव विक्रम राठोड व युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रशांत भाले यांनी घनश्याम कारळे यांना तालुका युवा सेना समन्वयकपदी निवड करण्यात आले असल्याचे पत्र नुकतेच दिले आहे.

### खुल्या कबड्डी स्पर्धेत यश

**श्रीगोंदा (प्रतिनिधी)–** निंबोडी (ता. कर्जत) येथे झालेल्या खुल्या कबड्डी स्पर्धेमध्ये महाराजा जिवाजी शिंदे विद्यालयातील खेळाडूंनी यश संपादन केले. यावेळी उपात्यंपूर्व सामन्यात आष्टी संघावर चार गुणांनी विजय मिळवला. तर उपात्य सामाना पुणे संघासोबत होवू त्यात विजय संपादन केले. सोमनाथ जांभळे, महेश रंधवे, युवराज कापसे, जुबेर बागबान, ऋषी भिसे, हर्षद कोथिंबिरे, आर्यन मचे, श्रेयस मेत्रे, निखील पवार, करण हराळ व शैलेंद्र निषाद या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत यश मिळवले. खेळाडूंना क्रीडा संचलिका कल्पना बागुल, क्रीडा शिक्षक संजय डफळ, संतोष जाधव, कोच हर्षद चौकडे यांचे मार्गदर्शन लाभले खेळाडूंचे महाविद्यालयीन विकास समितीचे चेअरमन आ. बबनराव पाचपुते, महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य बाबासाहेब भोस, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राहुल जगताप, महावीर पटवा, प्राचार्य महादेव जरे, उपप्राचार्य साळवे, जिमखाना विभाग प्रमुख अहिवळे, उपप्राचार्य मखरे, कॉमर्स विभाग प्रमुख भुजबळ, पर्यवेक्षक रत्नाकर झिटे विभाग प्रमुख, शिक्षक वर्ग व शिक्षक इतर कर्मचारी विद्यार्थी खेळाडू यांनी अभिनंदन केले.

### पथविक्रेताच्या दोन जागा रिक्त

**अहमदनगर (प्रतिनिधी)–** महापालिकेच्या पथविक्रेता समितीच्या निवडणुकीसाठी आठपैकी दोन जागांवर उमेदवारी अर्जच न आल्याने या दोन जागा रिक्त राहिल्या. तर, सहा जागांवर प्रत्येकी एक अर्ज आल्याने या सहा जणांची बिनविरोध निवड झाली. पथविक्रेता समितीच्या निवडणुकीसाठी काल मतदान होऊन मतमोजणी होणार होती. मात्र, सहा जागा बिनविरोध झाल्याने व दोन जागांवर उमेदवार नसल्याने मतदान झालेच नाही. निवडणुकीत अजय बाळासाहेब भुजबळ (इतर मागास प्रवर्ग), भिकाजी सोनाजी वाघ (अनुसूचित जाती), हमीद मन्नूभाई शेख (अल्पसंख्याक गट), लता संजय वाघमारे (सर्वसाधारण महिला), नंदकिशोर नेमीचंद असेरी (सर्वसाधारण), पन्नलाल लिलाराम लसगरे (सर्वसाधारण) हे सहा जण बिनविरोध निवडून आले आहेत. अनुसूचित जमाती महिला व विकलांग महिला या जागांसाठी उमेदवारी दाखल न झाल्याने या दोन जागा रिक्त राहिल्या आहेत. शिर्डी नगर परिषदेचे मुख्याधिकारी सतीश दिघे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.

### शिरूरमधील बॅटरी चोर पकडला

**शिरूर (तालुका प्रतिनिधी)–**चार ट्रकच्या सात बॅटऱ्या रात्रीच्या सुमारास चोरट्यांनी चोरुन नेल्या होत्या. यामुळे शिरूर शहरामध्ये खळबळ माजली होती. शिरूर पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाचे पोलिस हवालदार नाथसाहेब जगताप यांनी या चोरीचा तपास केला. यात तांत्रिक विश्लेषण व सीसीटीव्ही फुटेज तपासून पारधी वस्ती पाण्याची टाकी शिरूर येथील एक संशयित आर्यन एअरपोर्स पवार (वय १९) यास ताब्यात घेऊन तपास केला असता त्याने गुन्हा केल्याचे कबूल केले आहे. गुन्ह्यातील गेलेला माल शिरूर पोलिसांनी त्याच्याकडून तात्काळ जप्त केला आहे. पोलिस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे यांच्या मार्गदर्शनाखाली सखोल तपास करून नाथ जगताप यांनी आरोपी गजाआड केले.

### ग्रंथ पारायण सोहळ्याची सांगता

**अहमदनगर (प्रतिनिधी)–** श्री साईबाबा फाऊंडेशनच्या वतीने केडगाव येथील बँक कॉलनीतील साईबाबा मंदिराच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित साई सच्चरित्र ग्रंथ पारायण सोहळ्याची सांगता किर्तनाने करण्यात आली. यावेळी फाऊंडेशनचे सदस्य डॉ. मुकुंद शेवंगावकर, प्रकाश वाघ, अशोक झिने, अजितसिंग दडियाल, विजय गोरे, शिवाजी वाकचौरे, अशोक जाधव, कावेरी जाधव, श्रीनिवास सहदेव, सुनिल कोतकर,भुषण गुंड, जयद्रथ खाकाळ, दडियाल भाभी, प्रकाश चांदेकर, दत्तात्रय टेके, राजू हजारे, चव्हाण, संजय बोरगे उपस्थित होते.

# नगरमध्ये सीनेला पूर, पावसाचे पाणी घरात घुसले

## शहरासह उपनगरात नुकसान : खा. लंके, आ. जगताप यांच्यासह मनपा प्रशासन मदतीला

**अहमदनगर (प्रतिनिधी)–** शुक्रवारी रात्री ते शनिवारी सकाळी कल्याण महामार्गावरील सीना नदीचा पूल पाण्याखाली गेल्याने वाहतूक ठप्प होती. नगर शहरासह जिल्ह्यात विविध भागात ठिकठिकाणी दमदार पाऊस हजेरी लावत आहे. शुक्रवारी मध्यरात्री उशीरा आणि शनिवारी सकाळी नगर शहरासह उपनगरातील अनेक घरात पाणी घुसल्याने नागरिकांचे हाल झाले. यावेळी रात्री उशीरा खा. नीलेश लंके यांनी याठिकाणी भेट देत नागरिकांना धीर देण्याचा प्रयत्न केला. तर आ. संग्राम जगताप यांनी सीना नदीच्या पुराची पाहणी करत मनपा प्रशासनास सुचना दिल्या.

नगरमध्ये शुक्रवार रात्री ते शनिवारी सकाळदरम्यान काही तासात ८० ते १०० मिलीमिटर पाऊस झाल्याने सीना नदीला पूर आला आहे. काल पहाटे चार वाजेपासून महापालिकेचे आपत्ती विभागचे पथक पूर आलेल्या भागात तैनात करण्यात आले आहे. पुलाचे काम सुरु असल्याने साडेचार वाजेपासून पुलावरील वाहतूक बंद केली आहे. नागरिकांना पर्यायी रस्ता म्हणून वारुळाचा मारुती, माधवनगर ते नेप्तीनाका असा रस्ता असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले. तसेच प्रभाग अधिकार्यांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

शहरातून सीना नदी वाहत असून पात्रामध्ये मोठी अतिक्रमणे झाली आहे. काही ठिकाणी मातीचे भराव टाकल्यामुळे पावसाळ्यामध्ये सीना नदीला पूर आल्यानंतर कल्याण राष्ट्रीय महामार्ग पुराच्या पाण्याखाली जातो. त्यामुळे हा राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाला बंद करावा लागतो. वाहतुकीची मोठी समस्या निर्माण होते. सीना नदी पात्रात



मातीचा भराव, अतिक्रमण करणाऱ्यावर महापालिका, जिल्हाधिकारी प्रशासनाने तातडीने गुन्हे दाखल करावेत अशी मागणी आ. जगताप यांनी केली. तसेच महापालिका प्रशासनाने नागरिकांची गैरसोय होणार नाही, यासाठी काळजी घेण्याच्या सुचना दिल्या. मुसळधार पावसामुळे सीना नदीला आलेल्या पुराची पाहणी आ. जगताप यांनी केली. यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, माजी उपमहापौर गणेश भोसले, आयुक्त यशवंत डांगे, माजी सभापती अविनाश घुले, शहर अभियंता मनोज पारखे, इंजिनिअर श्रीकांत निंबाळकर, उद्यान प्रमुख शशिकांत नजन, राष्ट्रीय महामार्ग कार्यालयाचे अभियंता दिलीप तारडे, युवराज शिंदे आदीसह या भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मदतीला धावले खासदार लंके

- शुक्रवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील नरहरी नगर, गुलमोहर रोड येथील नागरिकांच्या घरात पाणी शिरले. त्यामुळे नागरिकांना अख्खी रात्री जागून काढावी लागली. नागरिकांनी नगरसेवक योगराज गाडे यांना संपर्क करून मदतीची विनंती केली. त्यांनी ही माहिती खा. नीलेश लंके यांना दिली. नगरसेवक गाडे यांनी दिलेल्या माहितीची तात्काळ दखत घेत खा. लंकेंनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांची स्थिती पाहून, त्यांनी आपत्ती व्यवस्थापन पथक आणि महापालिकेचे संबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क केला. नागरिकांनी वारंवार येणार्या या समस्येचा उल्लेख केला असता खा. लंके यांनी महापालिकेच्या आयुक्तांना यावर तातडीने उपाययोजना करण्याच्या सुचना दिल्या.

### पावसानंतर वीज गायब

- शुक्रवारी रात्री पावसानंतर जवळपास निम्म्यानगर शहरातील वीज गायब झाली होती. विशेष करून कल्याण रोड परिसारात सीना नदीजवळ वीजेचे पोल वाहून गेले. यामुळे या भागात शनिवारी दुपारी उशीरापर्यंत विज पुरवठा खंडीत झाला होता. त्यातच शनिवारी दिवसभर पावसाच्या सरी कोसळत होत्या. यामुळे वीज पुरवठा करण्याच्या कामात अडथळा निर्माण होत होता.

# पक्षाने दखल न घेतल्यास भाजपची जागा हातून जाईल

## अरूण मुंडे यांचा शेवगावच्या निर्धार मेळाव्यात इशारा : राजळे यांच्यावर नाव न घेता टीका

**शेवगाव (तालुका/ शहर प्रतिनिधी) –** जनतेसाठी भांडणाऱ्या कार्यकर्त्यांना संपवण्याचे उद्योग मतदारसंघातील प्रस्थापित करत आहेत. नात्यागोत्याच्या राजकारणामुळे मतदारसंघ बुडवण्याचे काम सुरू असून लोकप्रतिनिधींनी भाजप कार्यकर्तेऐवजी बगलबच्चांना पोसण्याच काम सुरू आहे. त्यामुळे विद्यमान लोकप्रतिनिधींच्या विरोधात मतदारसंघातून आवाज उठला असून आता बदल केल्याशिवाय पर्याय नाही, अशी कार्यकर्त्यांची भावना आहे. त्याची दखल पक्षालाही घ्यावी लागेल, अन्यथा भाजपची ही जागा हातातून जाईल असा इशारा भाजपचे प्रदेश सरचिटणीस अरुण मुंडे यांनी कार्यकर्त्यांच्या निर्धार मेळाव्यात दिली.

मतदारसंघातील कार्यकर्त्यांचा मेळावा शेवगाव येथे झाला. अध्यक्षस्थानी भाजपचे तालुकाध्यक्ष तुषार वैद्य होते. यावेळी मुंडे यांनी आ. मोनिका राजळे यांच्यावर नाव न घेता टीका केली. लोकप्रतिनिधींच्या नात्यागोत्याच्या राजकारणामुळे तालुक्यातील कार्यकर्ते त्रस्त झाले आहेत. ज्यांची गल्लीत निवडून येण्याची ऐपत नाही अशांना तालुका सांभाळायला दिला आहे. त्यांना विरोध करणाऱ्या भाजप कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत. असे राजकारण आजपर्यंत कधी झाले नाही. त्यामुळे तुम्ही परत आमदार होणार नाहीत. गावच्या सरपंचापासून जिल्हा परिषद, कारखाना, मार्केट कमिटी व आमदारकी अशी सर्व पदे तुम्हाला घरातच पाहिजेत. शासनाने लाडकी बहीण योजना सुरू केली. परंतु २०१४ सालापासून आम्ही लाडक्या बहिणीला सांभाळले. आता त्यांनी थांबावे व आम्हाला आशीर्वाद द्यावा असे ते म्हणाले. आम्ही भाजप विरोधात लढणार नाहीत असे ते सांगतात. मात्र भाजप सरकारकडून कोटी रुपये कारखान्यांसाठी आणले ते यांना चालतात का अशा शब्दात मुंडे यांनी घुले यांच्यावर टीका केली.

भाजप ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष गोकुळ दौंड म्हणाले, २५ ते ३० वर्षांपासून भाजपचे काम करत आहोत. त्यामुळे आम्हाला उमेदवारी मागण्याचा अधिकार आहे. मतदार संघातील घराणेशाहीने ५० वर्ष जनतेला फसवले पक्षाने आदेश दिला तर उमेदवारी करू अन्यथा अपक्ष उभे राहण्याचेही तयारी आहे. यावेळी बाळासाहेब सोनवणे, संजय मरकड, सतीश मगर, आत्माराम कुंडकर, शब्बीर शेख, संजय टाकळकर, विलास फाटके, रमेश कांबळे यांची भाषणे झाली. यावेळी अमोल सागडे, नगरसेवक अजय भारस्कर, अंकुश कुसळकर विकास फलके, दिगंबर काथवटे, गणेश गर्गे, भूषण देशमुख, भीमराव फुंदे, उदय मुंडे, सालार शेख, शितल केदार उपस्थित होते. प्रास्ताविक बाळासाहेब कोळगे यांनी केले. सूत्रसंचालन दीपक कुसळकर यांनी तर आभार गणेश कराड यांनी मानले.

# नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करा

## खा. लंके यांची शेवगाव तालुक्यातील पिकांची पाहणी

**शेवगाव (शहर प्रतिनिधी)–** दोन-तीन दिवसापासून झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून या नुकसानीचे त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी खा. निलेश लंके यांनी शेवगावचे तहसीलदार प्रशांत सांगडे यांच्याकडे केली आहे.

खा. लंके, राष्ट्रवादी ॲड. प्रतापराव ढाकणे यांनी शनिवारी वाघोली व परिसरातील गावाचा समक्ष जाऊन आढावा घेतला व झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी केली. यावेळी रस्ते चिखलमय झाल्याचे व शेतात दोन ते तीन फूट पाणी साचल्याचे निदर्शनास आले. कपाशी, तूर, मूग, सोयाबीन, ऊस व इतर पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे शेताचे पंचनामे होऊन नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी खा. लंके व ढाकणे केली. खा. लंके यांनी तहसीलदार सांगडे यांच्याशी संपर्क साधत, या परिसरातील झालेल्या नुकसानीचे पंचनामे करावेत असे आदेश दिले तहसीलदार सांगडे यांनीही उद्यापासून पंचनामे सुरू करावे, अशा सुचना दिल्या. यावेळी हरीश भारदे, शिवशंकर राजळे, राजेंद्र दौंड, बंडू बोरुडे, बंडू रासने,वजीर पठाण यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# घरासमोर लावलेल्या दुचाक्या जाळल्या

**अहमदनगर (प्रतिनिधी)–** घरासमोर उभ्या केलेल्या दोन दुचाक्या अज्ञात व्यक्तींनी पेटवून देवून जाळल्याची घटना नगर शहराजवळील नागरदेवळे गावात ग्रामपंचायत कार्यालयाशेजारी घडली आहे. याप्रकरणी भिंगार कम्प पोलिस ठाण्यात व्यक्तींच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सेजल पाखरे (रा. नागरदेवळे) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी पाखरे या कुटुंबासमवेत नागरदेवळे गावात ग्रामपंचायत कार्यालयाजवळ राहतात. गुरुवारी (दि.२२) रात्री घरासमोर त्यांनी उभ्या केलेल्या २ मोपेड गाड्या अज्ञात व्यक्तींनी पेटवून दिल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी व परिसरातील नागरिकांनी त्या विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत दोन्ही मोपेड मोठ्या प्रमाणावर जळल्या होत्या. याबाबतची माहिती त्यांनी भिंगार कम्प पोलिसांना दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली.

### भोसे गावात त्रिदिनी सप्ताह

**करंजी (वार्ताहर)–** भोसे गावात ग्रामस्थाच्या लोकसहभागातून नव्याने उभारण्यात आलेल्या मंदिरामध्ये विठ्ठल रुक्मिणीसह संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांच्या मूर्तीची देखील प्राणप्रतिष्ठा करत त्रिदिनी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार (दि.२६) पासून सप्ताहास प्रारंभ होत असून मूर्तीची शोभा यात्रा, जलाधिवास सप्त स्नान, धान्य दिवस पार पडणार आहेत. त्यानंतर दुसऱ्या दिवशी शांतीसूप्त पठण होम हवन होणार आहे. सायंकाळी महंत ज्ञानेश्वर माऊली कराळे यांची कीर्तन होणार आहे. बुधवारी मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार असून काल्याचे किर्तन वेदांताचार्य सत्यवान महाराज लाटे यांचे होऊन उपस्थित भाविक भक्तांना महाप्रसाद दिला जाणार आहे. या मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त महंत भास्करगिरी महाराज यांच्यासह अनेक संत महंत उपस्थित राहणार आहेत.

# पक्ष नेतृत्वाचा विश्वास असल्याने उमेदवारी चिंता नाही

## आ. राजळे : तोंडोळी येथे कार्यकर्त्यांचा स्नेहमेळावा

**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)–** दोन महिन्यांत विधानसभा निवडणुका होणार असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्यासह पक्षनेतृत्वाचा आपल्यावर विश्वास आहे. त्यामुळे उमेदवारीची चिंता करू नका. विधानसभा निवडणुकीत स्वतः उमेदवार समजून भाजप महायुतीच्या उमेदवाराला विजयी करा, असे आवाहन आ. मोनिका राजळे यांनी केले.

तोंडोळी येथील श्री क्षेत्र हरिहरेश्वर येथे श्रावणनिमित्त राजळे कुटुंबियाच्या वतीने ३० वर्षापासुन दरवर्षी महापूजा व अभिषेक करून स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. यावर्षीही राहुल राजळे यांनी महापुजा करून अभिषेक केला. त्यानंतर मेळाव्यात आ. राजळे बोलत होत्या. अध्यक्षस्थानी हभप गणपत महाराज होते तर भाजप तालुकाध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे, शहराध्यक्ष बंडू बोरुडे, रामकिस काकडे, काकासाहेब सातपुते, विष्णुपंत अकोलकर, भगवान आव्हाड, धनंजय बडे, संदिप पठाडे, चारुदत्त वाघ, नारायण पालवे, मुकुंद गर्जे, संजय किर्तने, महेश बोरुडे, वैभव आंधळे, भगवान साठे, शुभम गाडे, सचिन वायकर, मंगल कोकाटे, ज्योती शर्मा उपस्थित होते. आ. राजळे म्हणाल्या, दहा वर्षापासून केंद्रात व राज्यात भाजप महायुती सरकारच्या माध्यमातून निधी आणुन विकासाच्या माध्यामातून मतदारसंघाचा चेहरा मोहरा बदलविण्याचा प्रयत्न केला.

- पक्षातील पदाधिकाऱ्यांना मानाची पदे दिली.ठेकेदारी करण्यासाठी कामे दिली. तरीही विरोध केला जातोय. नेमकं काय चुकलं हे कळत नाही.
  – **राहुल राजळे,** माजी जिल्हा परिषद सदस्य.

- खा. सुजय विखे यांनी विकासकामे केली. मात्र विरोधकांनी जातीयवादाचे विष पेरले. त्यामुळे अपयश आले. आता तरी जातीय वादाला मुठमाती द्या. राजळे कुटुंबियांनी जातीपातीचे राजकारण केले नाही. काहीजण निवडणुक आली की स्वार्थासाठी जातीचे राजकारण करतात आशांना धडा शिकवावा.
  – **भगवान आव्हाड,** उपसभापती खरेदी विक्री संघ.

पक्षाशी प्रामाणिक राहत सर्व उपक्रम राबविले. जातीपातीचे राजकारणा केले नाही. मनामध्ये राग कधी धरला नाही, प्रत्येकाचे समाधान करण्याचा प्रयत्न केला. मात्र ज्यांचे समाधान झाले नाही, त्यांचेही आगामी काळात नक्कीच समाधान करू. विरोधकांकडे ठोस मुद्दाच नसल्याने ते खोटे अरोप करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतील. परंतु जनता सुज्ञ आहेत. प्रास्तविक बाजार समितीचे संचालक अजय रक्ताटे यांनी तर आभार सभापती संदिप पठाडे यांनी मानले.

# नगरमध्ये आंदोलन विरोधात प्रती आंदोलन

## महाविकास आघाडीकडून काळ्या फिती लावत निषेध तर महायुतीचे धरणे

**अहमदनगर (प्रतिनिधी)–** बदलापूर येथील घटनेच्या निषेधार्थ महविकास आघाडीच्या वतीने नगरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी काळ्या फिती तोंडावर बांधल्या होत्या. दरम्यान, महाविकास आघाडीच्या आंदोलनाविरोधात महायुतीच्या विरोधात वाडिपार्क येथील गांधी पुतळ्यासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

महाविकास आघाडीने बदलापूर घटनेच्या निषेधार्थ राज्यव्यापी बंद पुकारला होता. मात्र, न्यायालयाने बंदला परवानगी नाकारल्याने आघाडीतर्फे राज्यभरात निषेध आंदोलन करण्याचा निर्णय घेतला होता. नगरमध्ये काल छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ आघाडीच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. तोंडाला काळ्या फिती बांधून कार्यकर्त्यांनी हातात निषेधाचे फलक घेतले होते. यावेळी ठाकरे गटाचे शहरप्रमुख संभाजी कदम, कॉंगेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, राष्ट्रवादी पवार गटाचे शहराध्यक्ष अभिषेक कळमकर, विक्रम राठोड, भगवान फुलसोंदर, संजय शेडगे, शरद झोडगे, बाळासाहेब बोराटे, राजू भगत, योगीराज गाडे, सुरेखा कदम, मंगल भुजबळ, नलिनी गायकवाड़, अरुणा गोयल, मनोज गुंदेचा, दत्ता जाधव, सुरेश तिवारी, अशोक दहिफळे, दत्ता कावरे, संग्राम कोतकर, शाम नळकांडे, सचिन शिंदे, संदीप दातरंगे, मुन्ना भिगारदीवे, जेम्स आल्हाट, परेश लोखंडे, संतोष गेनपा, प्रा. सीताराम काकडे आदी उपस्थित होते.

तर शहर भाजपाच्या वतीने महाविकास आघाडीच्या निषेधार्थ वाडिया पार्क येथील महात्मा गांधींच्या पुतळ्या पुढे धरणे आंदोलन केले. यावेळी प्रिया जानवे, ॲड. अभय आगरकर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, सरचिटणीस सचिन पारखी, महेश नामदे, राहुल जामगावकर, अजय चितळे, विलास नंदी, अमोल निस्ताने, मनोज ताठे, गोपाल, वर्मा, राजेंद्र सातपुते, राजेंद्र काळे, विशाल खैरे, अशोक गायकवाड, सुधीर मंगलारप, विजय गायकवाड, सागर शिंदे, प्रविण ढोणे, बाळासाहेब भुजबळ, करण डापसे, सुजय मोहिते, मयुर बोचूघोळ, अरुण शिंदे, मिनानाथ मैड, दत्ता गाडळकर, नितीन शेलार, शशिकांत पालवे, अभिजित ढोणे, पुष्कर कुलकर्णी, सुरेश लालबागे, सुनील तावरे, महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्षा प्रिया जानवे, रेणुका करंदीकर, अर्चना बनकर संध्या पावसे, उज्वला भांगे, ज्योती गणेश दांडगे, सीमा खंदारे, रेखा मैड आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# तोंडावरपट्टी बांधून राष्ट्रवादीचा मुकमोर्चा

**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी) –** बदलापूर येथील अत्याचाराची घटना ही सरकारी धोरणांच्या तोंडाला काळे फासणारी आहे. राज्यात अत्याचाराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून महायुती सरकारच्या काळात कायद्या सुव्यवस्थेचे धिंडोडे उडाले असल्याची टीका राष्ट्रवादीचे सरचिटणीस ॲड. प्रताप ढाकणे यांनी केली.

ॲड. ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली पाथर्डी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळासमोर बदलापूर येथील घटनेचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी तोंडाला पट्ट्या बांधून मुका आंदोलन केले. यावेळी तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे, बंडू पाटील बोरुडे, सिताराम बोरुडे, वैभव दहिफळे, चंद्रकांत भापकर, दिगंबर गाडे, पांडुरंग शिरसाट, देवा पवार, वसंत बोर्डे, अतिश निऱ्हाळी, राजेंद्र बोरुडे, अरविंद सोनटक्के, योगेश रासने, अक्रम आतार, गणेश चितळकर, गोरक्ष ढाकणे, सचिन नागपुरे आदी उपस्थित होते. यावेळी ढाकणे म्हणाले, बदलापूरची घटना निंदनीय आहे. ही घटना झाकण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी सत्तापणाला लावली. मात्र जनतेच्या दबावा पुढे त्यांना झुकावे लागले. महाविकास आघाडीच्या बंद उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे मागे घेण्यात आला असला तरी निषेध आंदोलन राज्यभर होत आहेत. अन्याय विरोधात एकजूट दाखववावी असे आवाहन ढाकणे यांनी केले.